# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**विमुक्त जाती भटक्या जमाती वसंतराव नाईक महामंडळामधील कर्मचाऱ्यांसंदर्भात**

**(१) ३३२० (२२-१२-२०१४). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमुक्त जाती भटक्या जमाती वसंतराव नाईक महामंडळामध्ये एकूण किती अधिकारी कर्मचारी कार्यरत आहेत,

(२) तसेच, उक्त महामंडळातील एकूण कर्मचाऱ्यांपैकी किती कर्मचारी कायम व किती कर्मचारी हंगामी/रोजंदारीवर कार्यरत आहेत,

(३) या महामंडळातील एकूण अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनावर वित्तीय वर्षात (सन २०१२-२०१३) किती खर्च झाला, त्यापैकी किती रक्कमेस शासनाची मान्यता आहे,

(४) उक्त महामंडळामधील कार्यरत असलेल्या परंतु शासनाची मंजूरी नसतांना देखील कर्मचाऱ्यांना नियमबाह्य वेतन अदा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-११-२०१५) :**(१) ५८ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) सदर ५८ अधिकारी/कर्मचारी कायमस्वरुपी कार्यरत आहेत.

(३) महामंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनावर वित्तीय वर्ष २०१२-२०१३ मध्ये रु. ४०१.१८ लाख इतका खर्च झाला आहे, या खर्चास महामंडळाच्या संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरसाठे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत**

**(२) ५५०५ (०९-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरसाठे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मंजूर करण्यात आलेली आश्रमशाळा सुरु करण्यासाठी तसेच या आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) शासकीय आश्रमशाळा, सिरसाठे, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथील सोयी सुविधा अभावी (इमारत, पाणीपुरवठा इ.) इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची गैरसोय व शैक्षणिक नुकसान होवू नये याकरिता सदर शाळा शासन आदेश दि.२०/११/२०१३ अन्वये लहांगेवाडी, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथे कायम स्वरुपी स्थलांतरीत केली आहे. सदर वस्तुस्थिती आयुक्त, आदिवासी विकास यांच्या दि.९/१/२०१५ च्या पत्रान्वये श्रीमती निर्मला गावित (इगतपुरी), मा.विधानसभा सदस्य यांना कळविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोळघर (जि.रायगड) येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक मूलभुत सुविधा पुरविल्या जात नसल्याबाबत**

**(३) ५५१४ (०९-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजातील दुर्बल, आदिवासी घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन उपाययोजना आखते परंतु त्याची अंमलबजावणी होत नसल्याने कोळघर (जि.रायगड) येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक मूलभुत सुविधा पुरविल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १९७२ मध्ये सुरु झालेल्या आश्रमशाळेत अलिबाग, पेण, रोहा परिसरातील ५५० हून अधिक आदिवासी मुले-मुलीं निवासी शिक्षण घेत असून पहिली ते दहावी पर्यंत शिक्षण घेत असून योग्य सोय होत नसल्याने त्यांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सुविधा मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

शासन आदेश दि.२१/१२/२००९ नुसार आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीतील शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना आहारात सकाळचा नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवण, दुध, अंडी, केळी देण्यात येते. तसेच विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, पुस्तके, स्टेशनरी, बेडींग साहित्य इत्यादी शासनामार्फत पुरविले जाते.

(२) हे खरे नाही.

शासकिय आश्रमशाळा, कोळघर येथे इ. १ ली ते १० वी पर्यंत वर्ग असून मुले ३३९ व मुली २२८ असे एकूण ५६७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी २४३ मुले व १४८ मुली असे एकूण ३९१ निवासी विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांच्या निवासाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच पाण्याची कायमस्वरुपी सोय असून वीज सुध्दा उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळमनुरी तालुक्यातील (जि.हिंगोली) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत

**(४) ५६२३ (०९-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.राहूल आहेर (चांदवड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनूरी तालुक्यातील (जि.हिंगोली) जामगव्हाण, बोथी, गोटेवाडी येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळात विद्यार्थ्यांना अपु-या सोयीसुविधा मिळत असल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळांत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-११-२०१५)** :(१) हे खरे नाही.

जामगव्हाण, बोथी व गोटेवाडी शासकिय आदिवासी आश्रमशाळांच्या इमारतींचे टप्पा-१ चे बांधकाम पूर्ण झालेले असून तेथे पुरेशा प्रमाणात सोयीसुविधा उपलब्ध आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई एम.आय.डी.सी मध्ये प्रकल्पग्रस्तांना मिळालेल्या भूखंडावर व्यवसायासाठी कर्ज तसेच करामध्ये सवलत उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**(५) ६९१८ (१०-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील ज्या ग्रामस्थांच्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादित केल्या अशा प्रकल्पग्रस्तांना एम.आय.डी.सी.ने भूखंडाचे वाटप केले असून या भूखंडावर प्रकल्पग्रस्त व्यवसाय करु इच्छितात परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांना व्यवसाय उभा करणे शक्य होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पग्रस्तांना व्यवसाय सुरु करण्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच त्यांना करामध्ये सवलत मिळावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. उद्योग मंत्री महोदयांना जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना व्यवसायासाठी कर्ज व करामध्ये सवलत देण्याबाबत शासनास्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-११-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे,

(३) मुबई कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त प्रकल्पग्रस्तांना स्वत:चा उद्योग सुरु करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे यांचेकडून बेरोजगारांचे मेळावे आयोजित करण्यात येत आहेत,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) चिंचणे व कामेवाडी या गावांना आदिवासी गावांचा दर्जा देण्याबाबत**

**(६) ८७७३ (०९-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) चिंचणे व कामेवाडी या गावांना आदिवासी गावांचा दर्जा देण्याची मागणी मा. आदिवासी विकास मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-११-२०१५) :**(१) चंदगड तालुक्यातील चिंचणे व कामेवाडी गावांचा आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१०/११/२०१४ व दि.१७/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.मंत्री, आदिवासी विकास यांचेकडे मागणी केली आहे.

(२) केंद्र शासनाने आदिवासी उपयोजना क्षेत्र जाहिर करण्यासंदर्भात निश्चित केलेल्या निकषानुसार आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण व भौगोलिक संलग्नता या निकषाची पूर्तता होत नसल्याने सदर गावांचा पेसा कायद्यांतर्गत समावेश शक्य नसल्याचे संबंधित लोकप्रतिनिधींना दि.१३/०१/२०१५ रोजी मा.मंत्री (आ.वि.) यांच्या स्वाक्षरीने कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विक्रमगड तालुक्यातील आदिवासीसाठींच्या योजना अद्‌याप पूर्ण न झाल्याबाबत

**(७) ९४४२ (०९-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड तालुक्यातील आदिवासीसाठी शासनाच्या पाणीपुरवठा योजना, रोजगार हमी योजना, जलस्वराज्य योजना, नळ पाणी पुरवठा योजना, अंगणवाडी, स्मशानभूमी इ. ची कामे गेल्या काही वर्षात सुरु होऊनही अद्‌यापपर्यंत पुर्ण झालेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींच्या विकासासाठी आवश्यक ती आर्थिक तरतुद अर्थसंकल्पात करुनही विविध योजना अपु-या राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, आदिवासी विकासासाठी सुरु असलेल्या विविध कामाच्या एजन्सीमध्ये सुसुत्रतेचा अभाव तसेच संबंधित अधिका-यांचे सुरु असलेल्या कामांवर आवश्यक देखरेख (सुपरविझन) नसल्यामुळे सदरहू कामे अपुरी राहतात, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त राहिलेली विविध कामे पुर्ण होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे, तसेच, उक्त प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई सुरु केली आहे वा करणार आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-११-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) विक्रमगड तालुक्यातील आदिवासींसाठी राबविण्यात येत असलेल्या प्रस्तुत प्रश्नामध्ये उपस्थित शासकीय योजनाबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे :-

१) रोजगार हमी योजना :- रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०११-१२ व २०१२-१३ या वर्षात मंजूर केलेल्या ६०७ विहिर कामांपैकी ४८५ विहिर कामे पूर्ण करण्यात आली तसेच १०७ विहिर कामे रद्द करण्यात आली, उर्वरित १५ विहिर कामे दि.१५/११/२०१५ पर्यंत पूर्ण करण्यासाठी लाभार्थी व ग्रामसेवक यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

२) जलस्वराज्य प्रकल्प :- विक्रमगड तालुका जलस्वराज्य प्रकल्प गट विक्रमगड अंतर्गत एकूण १३ ग्रामपंचायतीमध्ये १९९ कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

३) नळ पाणी पुरवठा योजना :- ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग जव्हार ता.विक्रमगड अंतर्गत लोकसहभाग व मागणी आधारीत पुरवठा तत्वावर १० नळ पाणी पुरवठा योजनांची कामे सुरु असून मौ. हातणे व दादडे येथील कामे अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व ठेकेदार यांचेमधील अंतर्गत वादामुळे व मौजे साखरे, देहर्जे, केव येथील प्रकरणे न्याय प्रविष्ठ असल्यामुळे प्रलंबित आहेत व इतर कामे जिल्हापरिषदेमार्फत सुरु करण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

४) अंगणवाडी :- सन २०१०-११ व २०११-१२ या वर्षात एकूण ९३ अंगणवाडीच्या कामांना मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी ६६ अंगणवाडीचे काम पूर्ण झाले व ३ कामे अपूर्ण असून उर्वरित २४ अंगणवाडीच्या कामांना सन २०१४-१५ या वर्षात फेर मंजूरी देऊन कामे सुरु आहेत. अपूर्ण अंगणवाडीच्या कामाबाबत संबंधित ग्रामसेवक यांच्या विरुध्द खातेनिहाय चौकशी चालू आहे.

५) स्मशानभूमी :- जन सुविधा योजनेंतर्गत सन २०१०-११ ते २०१३-१४ या वर्षात एकूण ७९ स्मशानभूमीची मंजूर कामे पूर्ण झाली आहेत.

---

**औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम पश्चिम विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करून पदोन्नती मिळविल्याबाबत**

**(८) ९५७० (१०-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम पश्चिम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.बी.जी.पवार यांच्यावर जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करून शासनाची दिशाभूल करून पदोन्नती मिळविल्याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभाग मंडळ, औरंगाबाद कार्यालयाचे अधिक्षक श्री.माधव मोरे यांनी दिनांक ५ ऑगस्ट, २०१४ रोजी क्रांती चौक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच श्री.बी.जी.पवार यांनी दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी नियुक्ती संपलेली असतांना श्री.पवार अद्यापही कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास त्यांना शासनाने कोणत्या निकषा आधारे सदर पदावर कार्यरत ठेवले आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार श्री.बी.जी.पवार यांचेवर तातडीने निलंबनाची कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१५)** :(१) होय.

(२) होय.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १६.६.२००८ मधील तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायानुसार शासन मान्यतेने श्री.बी.जी.पवार यांची कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावरील सेवा तात्पुरत्या स्वरुपात चालू ठेवण्यात आली आहे.

(४) श्री.बी.जी.पवार, उप विभागीय अभियंता यांनी अनुसूचित जमातीचे खोटे प्रमाणपत्र मिळवून पदोन्नतीचा लाभ घेऊन शासनाची फसवणूक केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द क्रांती चौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद शहर येथे दिनांक ५.८.२०१४ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. याशिवाय दिनांक २३.५.२०१४ चे आदेश व ज्ञापनान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक तालुक्यातील सातपूर व अंबड या औद्योगिक वसाहतीमध्ये गुन्हेगारी वाढल्याबाबत**

**(९) १६१५२ (१०-०४-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपूर व अंबड या नाशिक तालुक्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये छोटे-मोठे उद्योजक किती आहेत,

(२) असल्यास, मागील दोन वर्षात नविन उद्योगांची काही भर पडली आहे काय, अथवा काही उद्योग बंद झाले आहेत काय,

(३) असल्यास,या दोन्ही औद्योगिक वसाहतीत किती कामगार कार्यरत आहेत, व या कामगारांसाठी किमान वेतन दिले जात आहे काय,

(४) असल्यास, सातपूर, अंबड या औद्योगिक वसाहतीच्या ठिकाणी गुन्हेगारीचे स्वरुप मोठया प्रमाणावर वाढले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-१०-२०१५)** :(१) सातपूर व अंबड या नाशिक तालुक्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये लघु, मध्यम व मोठे असे एकूण ३१३५ उद्योग घटक कार्यरत आहेत.

(२) मागील दोन वर्षात सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये ३७९ उद्योग घटकांची भर पडली आहे. तसेच मागील दोन वर्षात उद्योग घटक बंद करण्यासंबंधीचे अर्ज/निवेदने प्राप्त झालेली नाहीत.

(३) सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये एकूण ६१,४६२ कामगार किमान वेतन किंवा त्यापेक्षा जास्त वेतनावर कार्यरत आहेत. तसेच ७७ कामगारांना किमान वेतन मिळत नसल्याबाबतची तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याबाबत किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) सातपूर व अंबड औद्योगिक क्षेत्रात रहिवाशी क्षेत्र वाढल्याने किरकोळ स्वरुपाच्या तक्रारी पोलीस स्टेशन येथे प्राप्त होतात.

सातपूर व अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एमआयडीसी परिसरामध्ये असलेल्या झोपडपट्टीमध्ये वेळोवेळी कोम्बिंग ऑपरेशन राबविले जाते. तसेच पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील गुन्हेगारांची तपासणी करण्यात येऊन संशयित आढळल्यास त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. तसेच सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बीट मार्शल पेट्रोलिंग करीत असतात व वरिष्ठ पोलीस अधिका-यांकडून छोट्या मोठ्या कंपनी मालकांना कंपनीच्या परिसरात सुरक्षा रक्षक व सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याबाबतच्या सूचना देण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावनेर तालुक्यातील श्रावणबाळ योजना व राजीव गांधी अर्थसहाय्यांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१०) १७०४५ (३०-०७-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर तालुक्यातील श्रावणबाळ योजना व राजीव गांधी अर्थसहाय्यांची ३ हजार प्रकरणे मागील ६ महिन्यापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संपूर्ण अर्ज कर्मचा-यांमार्फत तपासून शिफारस करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-११-२०१५)** :(१) सावनेर तालुक्यात श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील सर्व अर्ज निकाली काढले आहेत. राजीव गांधी अर्थसहाय्य योजनेऐवजी संजय गांधी निराधार अनुदान योजना अशी योजना असून सद्यस्थितीत या योजनेत २ अर्ज प्रलंबित आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रलंबित प्रकरणे संजय गांधी योजना समितीच्या आगामी बैठकीत निर्णयार्थ सादर करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विटभट्टी व्यवसायाला उभारी देण्याबाबत

**(११) १७३२० (१९-०८-२०१५). श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विटभट्टी व्यवसायाला खादी ग्रामोद्योग मंडळाच्या वतीन कर्जरुपाने ५० टक्के अनुदान स्वरुपात वित्त पुरवठा केला जायचा पण सद्यःस्थितीत तो होत नसल्याने हा व्यवसाय संकटात आला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विटभट्टी व्यवसायाला उभारी देण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१९-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

राज्यातील विटभट्टी व्यवसायासाठी खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने कर्जरुपाने ५० टक्के अनुदान स्वरुपात वित्त पुरवठा करण्याची योजना राबविली जात नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या लंडनमधील घराची खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(१२) १७५७२ (३०-०७-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनमधील वास्तव्य असलेले घर खरेदी करुन तिचे स्मारकात रुपांतर करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मा.सामाजिक न्यायमंत्री तसेच मा.राज्यमंत्री व त्या विभागाचे प्रधान सचिव हे माहे एप्रिल २०१५ मध्ये लंडन दौ-यावर गेले असून लंडनला जाण्यासाठी १० एप्रिल, २०१५ रोजी काढलेल्या शासन निर्णयात दौऱ्यासाठी १५ लाख रुपये खर्च महामंडळाच्या भाग भांडवलातून करण्याचे म्हटले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लंडनला निघण्यापुर्वी सामाजिक न्याय विभागाने २२ एप्रिल २०१५ रोजी दुसरा एक आदेश काढून त्यात लंडन दौऱ्यास खर्च २० लाख रुपये दाखविण्यात आला म्हणजेच दौऱ्याच्या आधीच १२ दिवसात ५ लाख रुपयांनी खर्च वाढल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, लंडनमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वास्तव्य असलेली वास्तुची खरेदी प्रक्रिया शासनाच्या वतीने माहे मे, २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे अपेक्षित असतांनाही अद्यापपर्यंत उक्त घर खरेदी न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरील प्रकरणी शासनामार्फत चौकशीअंती कोणती कार्यवाही करण्यात आली वा प्रस्तावित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे

**श्री. राजकुमार बडोले (२४-०९-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) व (४) लंडन येथील घराची किंमत व इतर अनुषंगिक बाबी स्पष्ट होण्याच्या अनुषंगाने मेसर्स सेडॉन यांच्या मार्फत नेमलेले सेर्व्हेअर/व्हॅल्युअर मेसर्स वॉल्टर वीन व भारतीय उच्चायुक्तांच्या शिफारशीनुसार नियुक्त केलेले व्हॅल्युअर मेसर्स डॉबीन अँड सुल्लेवन या दोन सर्व्हेअर कडून अहवाल प्राप्त झाले आहेत. सदर अहवालांचा अभ्यास करुन घर खरेदीची किंमत व त्यानुषंगाने पूर्ण करावयाच्या कायदेशीर बाबी/प्रक्रिया यासाठी डीएसके लीगल ॲडव्होकेट व सॉलीसीटर यांना मे.सेडॉन, भारतीय उच्चायुक्त व अन्य सर्व संबंधित यांच्याशी विचार विनिमय करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यानुसार खरेदीबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरेगाव भिमा (पुणे) येथील ग्रामपंचायत पातळीवर ३ टक्के निधीतून अंध व्यक्तींना मदत देण्याबाबत**

**(१३) १७६६८ (३०-०७-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरेगाव भिमा (पुणे) येथील शंभर टक्के अंध असलेल्या व्यक्तीला संजय गांधी निराधार योजनेतून मदतीसाठी गेले वर्षभर शिरुर येथील तहसिलदार कचेरीत फे-या मारुन मदतीऐवजी उलट दोन हजाराची पदरमोड करावी लागली आहे, तसेच लाभ मिळण्याऐवजी थेट पोलीस कोठडीत टाकण्याची धमकी शिरुरच्या नायब तहसिलदार यांनी दिली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायत पातळीवर ३ टक्के निधीतून अपंगांना मदत मिळण्याची मागणीही ग्रामस्थ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील निवासस्थानात विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१४) १७९४२ (३०-०७-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील वास्तव असलेल्या निवासस्थानात राज्य शासनातर्फे स्मारक उभारण्यात येणार असून विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे, तसेच शासनाने उक्त बाबतीत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर अंतरराष्ट्रीय स्मारकाची उभारणी व विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरु करण्यासाठी सदर प्रकरणी निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-११-२०१५) :**(१) व (२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९२१-२२ मध्ये वास्तव्य केलेले लंडनस्थित १० किंग्ज, हेन्री रोड, एन.डब्ल्यू.३ लंडन येथील घर ऐतिहासिक स्मारक म्हणून जतन करण्यासाठी राज्य शासनामार्फत खरेदी करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये रु.४०.०० कोटी एवढी तरतूद पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आली आहे. सदर कार्यवाही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून करण्यात येत आहे. उपरोक्त वास्तुचे रुपांतर स्मारकात करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याकरीता ती जागा महाराष्ट्र शासनास हस्तांतरीत करण्याचा अनुषंगाने वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ व महाराष्ट्र शासन असा त्रिपक्षीय करार (MoU) दि.०५.०४.२०१५ रोजी झाला आहे. सदर करारातील खंड क्र.२.१ नुसार जागा हस्तांतरणासंबंधी अटी/शर्ती अंतिम

करण्यासाठी सहसचिव, वस्त्रोद्योग, मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती नियुक्त करण्यात आली आहे. सदर कार्यवाही नगर विकास विभागाकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या सर्व विभागात तसेच अपंगाच्या शाळांत**
**अपंगासाठी जागा भरण्याबाबत**

**(१५) १८४५२ (३०-०७-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शामराव पाटील (कराड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या सर्व विभागात अपंगासाठी राखीव असलेल्या तीन टक्के जागा तसेच अपंगाच्या शाळांमधील कर्मचारी भरतीत अपंगासाठी राखीव असलेल्या पन्नास टक्के जागा वर्षानुवर्षे भरल्या जात नाहीत ही बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपंगांवर इतर विभागांकडून अन्याय सुरु असतांना अपंगांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या सामाजिक न्याय विभागाकडूनही पन्नास टक्के जागा भरण्याबाबत कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-१०-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) अपंग अधिनियम, १९९५ ची राज्यात सन १९९६ पासून जशीच्या तशी अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार शासकीय सेवेत अपंगाकरीता एकूण ३ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्य शासनामार्फत सरकारी नोकऱ्या व योजनांमध्ये कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अनुदानित / विनाअनुदानित अपंग शाळांमध्ये मान्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे भरताना ५०टक्के पदे अपंग प्रवर्गातून यापुढे भरण्यात यावीत असे शासन परिपत्रक दिनांक १९ डिसेंबर, १९९५ रोजी निर्गमित करण्यात आलेले होते तथापि, आरक्षणाबाबतचे शासनाचे आदेश व अपंग अधिनियम, १९९५ मधील तरतूदींची अंमलबजावणी होऊ शकली नाही हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळामार्फत ऑक्टोबर महिन्यात भात खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत**

**(१६) १९०२० (३१-०७-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासी शेतक-यांकडून दरवर्षी डिसेंबर-जानेवारी, महिन्यामध्ये आधारभूत भात खरेदी केंद्र सुरु करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सणासुदीचे दिवस तसेच कुटुंबाच्या गरजा लक्षात घेता तसेच भाताला योग्य वेळी योग्य भाव मिळावा याकरीता सन २०१५ या वर्षापासून आधारभूत केंद्र ऑक्टोबर महिन्यापासून सुरु करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, शहापूर, यांनी मा. आदिवासी मंत्री महोदयांकडे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळाद्वारे धान खरेदी केंद्र सुरु झाले आहे, हे ही खरे आहे काय, तसेच खरेदी करण्यात आलेल्या धानाचा वाहतूक भत्ता निश्चित झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गडचिरोली जिल्हयातील जवळपास १ लाख ३० हजार क्विंटलपेक्षा जास्त धान्य उचल झालेली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रश्न भाग १ ,२, ३,४ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-११-२०१५) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४), (५) व (६) सन २०१४-१५ या हंगामात गडचिरोली जिल्ह्यात आधारभूत खरेदी योजनांतर्गत एकूण ५,६७,२२३.७४ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आलेली असून जून २०१५ अखेरपर्यंत ५,०८,१८२.६१ क्विंटल धान भरडाईसाठी पाठविण्यात आला आहे. धानाच्या भरडाईचे दर व वाहतुक खर्च हा अन्न महामंडळ व अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत निश्चित केला जात असून अद्याप सदर दर निश्चित झालेला नाही. तथापि उर्वरित धान भरडाईला पाठविण्याची कार्यवाही आदिवासी विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

---

**शहापूर-किन्हवली-सरळगाव (जि.ठाणे) येथील रस्त्यावर अपघात होत असल्याबाबत**

**(१७) १९०२१ (०३-०८-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर-किन्हवली-सरळगाव (जि.ठाणे) येथील रस्त्यावर वाढत्या वाहतुकीमुळे सतत अपघात होतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता रुंदीकरणासाठी स्थानिक जनतेने व लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग, शहापूर व शासनाकडे सतत दोन वर्षांपासून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्ता रुंदीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) येथील आदिवासी भागातील खरपत येथे पूल बांधण्याबाबत**

**(१८) १९०२२ (३०-०७-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) येथील आदिवासी भागातील खरपत व खरपत नं.१ या दरम्यान मोठा पूल नसल्याने पावसाळ्यात तेथील जनतेला, शालेय मुलांची तसेच रुग्णांची गैरसोय होवून या दोन्ही गावांचा संपर्क तुटला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खरपत या ठिकाणी पूल होण्याबाबत तेथील जनतेनी तसेच लोकप्रतिनिधीनी वारंवार मागणी करुनसुध्दा कोणती कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१२-२०१५) :** (१) शहापूर (जि.ठाणे) सावरोली ग्रामपंचायत हद्दीतील खरपत १ व खरपत २ या दोन गावांच्या दरम्यान वाहत असलेल्या शाई नदीच्या पात्राचे दोन प्रवाह निर्माण झाल्याने पात्राची रुंदी वाढल्यामुळे गावांचा संपर्क तुटला जातो.
(२), (३), (४) व (५) खरपत क्र. १ व २ या गावांची लोकसंख्या, रस्त्याचा दर्जा तसेच वाहतूक वर्दळ विचारात घेता याठिकाणी मोठया पुलाचे बांधकाम करणे आर्थिकदृष्ट्या संयुक्तिक वाटत नाही.

---

**पुणे जिल्हयातील रांजणगाव गणपती (ता. शिरुर) येथील औदयोगिक वसाहतीच्या टप्पा ३ मधून वगळलेल्या जमिनीच्या भूसंपादनाचे शेरे काढण्याबाबत**

**(१९) १९२३९ (३१-०७-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील रांजणगाव गणपती (ता. शिरुर) येथील औदयोगिक वसाहतीच्या टप्पा ३ मधून वगळलेल्या ८१४ हेक्टर जमीनीच्या ७/१२ वरील भूसंपादनाचे शेरे काढण्यात येतील असे उदयोगमंत्री महोदयांनी दिनांक ३० मार्च २०१५ रोजी जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रांजणगाव औदयोगिक वसाहतीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी रांजणगाव, कारेगाव, बाभूळसर व करडे या चार गावामधील १५२५ हेक्टर जमीन अधिसूचित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सप्टेंबर २०१४ मध्ये निर्णय होऊन १५२५ हेक्टर जमीनीपैंकी ८१४ हेक्टर जमीन वगळयाचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. सुभाष देसाई (१६-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) रांजणगाव, औद्योगिक टप्पा क्र.३ साठी मौजे रांजणगाव गणपती, कारेगाव, बाभूळसर खुर्द व करडे या गावातील एकूण १५२५.१४ क्षेत्रास प्रकरण ६ च्या तरतुदी लागू करण्यासंबंधीची अधिसूचना दिनांक ९/३/२००७ च्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. तद्नंतर सदर क्षेत्रातील ४०४.७४ हे.आर. क्षेत्रातील जमिनी या बागायती असल्यामुळे त्या सन २०१४ साली वगळण्यात आल्या होत्या व उर्वरित ११२०.४० हे.आर. क्षेत्रासंदर्भात नुकसान भरपाईचे दर निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्यासमवेत संबंधित खातेदारांची बैठक आयोजित करण्यात आली असता, बैठकीत ८१४ हे.आर. क्षेत्राच्या खातेदारानी भूसंपादनास विरोध केल्यामुळे जे जमिनधारक सदर क्षेत्रासाठी संमती देतील तेवढेच क्षेत्र संपादन करावे व उर्वरित क्षेत्र वगळण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ८१४ हे.आर. क्षेत्राची पडताळणी करुन ८११.७३ हे.आर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याची अधिसूचना दिनांक ३/८/२०१५ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली असून, त्यानुसार पुढील कार्यवाही उपविभागीय अधिकारी यांच्याकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रक्ताच्या नातलगांना जातवैधता प्रमाणपत्रे दुर्लक्षून त्यांच्या अन्य नातलगांना वैधता प्रमाणपत्र नाकारण्यात आल्याबाबत**

**(२०) १९८८३ (०६-०८-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रक्ताच्या नातलगांना उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मिळालेली जातवैधता प्रमाणपत्रे दुर्लक्षून त्यांच्या अन्य नातलगांना वैधता प्रमाणपत्र नाकारणा-या कोकण विभागीय (ठाणे) जात प्रमाणपत्र समितीवर शासनाने कारवाई करावी, असे आदेश मा.उच्च न्यायालयाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-१०-२०१५) :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.९३५६/२०१४ मध्ये दि.२३ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या आदेशामध्ये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या व समितीशी संबंधित असणारे अधिकारी हे मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने वैधता प्रमाणपत्र पारित करण्यासंदर्भात दिलेले निर्णय विचारात न घेता अथवा दुर्लक्षित करुन निर्णय देत असल्याबाबत निरीक्षण नोंदविले आहे. विशेषत: नातेवाईकांची प्रकरणे, अशा समित्या व अधिका-यांसंदर्भात शासनाकडून परिपत्रके व आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता असल्याचेही निरीक्षण नोंदविले आहे. सदर बाब विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्यात येत आहे.

---

**अचलपूर व चांदूरबाजार येथे सामाजिक न्याय विभागाचे मुलींचे वसतिगृहाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२१) २०४३८ (३०-०७-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर व चांदूरबाजार येथे सामाजिक न्याय विभागाचे मुलींचे वसतिगृहाकरिता जागा उपलब्ध न करुन दिल्यास १ जून, २०१५ रोजी सामाजिक न्याय विभाग कार्यालयात उपोषण आंदोलन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी शासनास निवेदनाद्वारे कळविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१५)** :(१) होय, अशा स्वरुपाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१९/५/२०१५ रोजी दिले आहे.

(२) त्या अनुषंगाने अचलपूर येथील वसतीगृहांकरिता नझुल शिट नं.१२/१३ भुमापन क्र.२ मधील १.५५ हे.आर पैकी ०.९५ जागेचा आगाऊ ताबा मिळण्याबाबत मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांना विनंती करण्यात आलेली आहे आणि चांदुरबाजार येथील वसतीगृहाकरिता नगरपरिषदेच्या मालकीची जागा मिळणेबाबतचा प्रस्ताव उप विभागीय अधिकारी, चांदुरबाजार यांना सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी भवनाचे बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२२) २०४६७ (३१-०७-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालूकास्तरावरील आदिवासी भवनाचे बांधकामास १ कोटी ५० लाख रुपायांच्या वाढीव निधीस मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानीक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दि. ९/१/१५ रोजी शासनास पत्र लिहून मागणी केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०५-११-२०१५)** :(१) व (२), राज्यातील आदिवासी भागामध्ये आदिवासी सांस्कृतिक संकूल बांधण्याच्या योजनेस दिनांक १५ मे, २००४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे, त्याअन्वये सांस्कृतिक संकूल बांधण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका/महानगरपालिका यांनी याकरीता विनामूल्य जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, शासन निर्णय दिनांक १३ मार्च, २०१२ अन्वये आदिवासी सांस्कृतिक संकूल बांधकामाची कमाल आर्थिक मर्यादा रु. १.०० कोटी इतकी करण्यात आली आहे, मा. विधानसभा सदस्य यांच्या दिनांक ९ जानेवारी २०१५ च्या पत्राच्या अनुषंगाने आदिवासी सांस्कृतिक संकूलांच्या बांधकामाची मर्यादा रु. १.५० कोटी करण्यासंदर्भात आदिवासी विकास, नाशिक तसेच अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी पाडयांच्या न्याय हक्कांसाठी श्रमजीवी संघटनेने आंदोलन केल्याबाबत**

**(२३) २०४७६ (३१-०७-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी पाडयांच्या न्याय हक्कांसाठी श्रमजीवी संघटनेने दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी अभिनव आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी पाडयांच्या न्याय हक्कासाठी श्रमजीवी संघटनेच्या मागण्या काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०५-११-२०१५) :**(१) हे खरे नाही,

श्रमजीवी संघटनेने त्यांच्या दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ च्या पत्रान्वये त्यांच्या संघटनेमार्फत ठाणे पालघर जिल्हयात दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी कोणत्याही प्रकारचे अभिनव आंदोलन केले नसल्याचे कळविले आहे,

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळंब-पाषाणे-वांगणी (ता.कर्जत, जि.रायगड) या रस्त्याच्या कामाबाबत**

**(२४) २०९६१ (१३-०९-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब-पाषाणे-वांगणी (ता.कर्जत, जि.रायगड) या रस्त्याच्या कामासाठी सन २०१४-२०१५ या वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करणे व निविदा मागविणे आवश्यक असताना अद्‌याप सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा माहे मे, २०१५ अखेर उघडण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर निविदा उघडून सदर रस्त्याचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१२-२०१५) :**(१) होय.

(२) कळंब-साळोख-वांगणी रस्त्याची कामे जून २०१४ च्या अर्थसंकल्पात समाविष्ठ झालेली आहेत. जून ते ऑक्टोबर दरम्यान पावसाळा असल्याने रस्त्याचे सर्वेक्षण करणे शक्य झाले

नाही. तद्नंतर सर्वेक्षण अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मान्यता प्राप्त करणे, प्रारुप निविदा तयार करणे, मंजूरी प्राप्त करणे, निविदा जाहिरात प्रसिध्द करणे, निविदा मागविणे, निविदा उघडणे इत्यादी कामे पूर्ण करणे आवश्यक होते, त्यासाठी निविदा उघडण्यास विलंब लागला होता.

(३) सद्यस्थितीत सदर कामाच्या निविदा उघडल्या असून निविदा निश्चित झालेल्या आहेत. ठेकेदाराकडून सदर कामे निविदेत नमूद केलेल्या विहित कालावधीत पूर्ण करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील खोपोली-पाली रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत

**(२५) २१०१३ (१३-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील खोपोली-पाली रस्त्याच्या रुंदीकरणाअभावी वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात होत असून त्याचा त्रास स्थानिक नागरीकांना होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाकण-पाली रस्त्याची दुरुस्ती करताना रस्त्याच्या बाजूला टाकण्यात आलेली माती व डोंगर उतारावरील दगड रस्त्यावर येत असून वाहतूकीस अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रस्त्याचे रुंदीकरण तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) वाकण-पाली-खोपोली रा.मा. ९३ या मार्गावरील कि.मी ०/०० ते ८/८०० या लांबीतील रस्त्याच्या रुंदीकरणाकरिता व नदी किनारी व घाटभागातील वळणांवर संरक्षण भिंती/कठडे बांधणे व अनुषंगिक उपाययोजना याकरिता सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये रक्कम रु. १५० लक्षचे काम मंजूर करण्यात आले आहे. सदर कामाच्या निविदा बोलावून निधी उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्यात येत आहे.

तसेच सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये परळी गावातील रस्त्याची लांबीचे (सा.क्र.२५/४०० ते २५/८००) ७.०० मीटर रुंदी सह काँक्रीटीकरण करणे या करिता रक्कम रु. ६०.०० लक्ष चे काम मंजूर आहे. सदर कामाच्या निविदा बोलावून निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत-मुरबाड रस्त्यावरील पेज नदीवरील सावळे गावाजवळील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२६) २१०१६ (३१-०७-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत-मुरबाड रस्त्यावरील पेज नदीवरील सावळे गावाजवळील पुलाचे संरक्षक कठडे तुटून पुलाला तडे गेल्याने पुल धोकादायक व कमकुवत झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलावरून मोठ्या प्रमाणात कंटेनर, मालवाहतूक ट्रक, एस.टी बसेस तसेच खाजगी वाहनांची ये-जा चालू असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१५) :**(१), (२) व (३)

सदर पुलाचे कठडे वाहनांच्या धडकेने तुटून पडलेले होते व पुढील अपघात होऊ नये म्हणून तातडीने कठड्याच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले असून सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीस सुरळीत ठेवण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यातील (जि.रायगड ) येथील पोसरी नदीवरील**
**पुलाचे काम अर्धवट असल्याबाबत**

**(२७) २१०१७ (०४-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) येथील आदिवासी भागात असलेल्या पोसरी नदीवरील पुलाचे काम गेल्या दोन वर्षांपासून अर्धवट अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखो रुपये खर्च होऊन देखील हा पूल पूर्ण झाला नसल्याने ग्रामस्थ आणि शेतकरी यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१२-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) मुख्य पुलाचे काम व बोरगावच्या बाजूचा जोडरस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. तथापि, दुसऱ्या बाजूला शेतीकडे जाण्यासाठीच्या जोडरस्त्याच्या बांधकामात संबंधित शेतकऱ्यांनी अडथळा निर्माण केला. संबंधित शेतकऱ्यांसोबत चर्चा करुन काम लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या दुरुस्तीबाबत**

**(२८) २११५२ (१४-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील टी.बी. वॉर्डामधील तळमजल्यावरील २०० स्के. फुटाचे फ्लोअर बाथरुम, भितींची किरकोळ डागडूजी बाथरुमचे छतदुरुस्ती करणेकरिता बांधकाम विभागाने ५५ लक्ष रु. अंदाजपत्रक दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम विभाग अधिकाऱ्यांनी ५५ लक्ष रु. अंदाजपत्रक तयार करतांना आपल्या वरिष्ठांची मान्यता घेतली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी मा.अधिष्ठात्याने या कामाच्या संदर्भाने खाजगी अभियंत्याकडून केवळ ५ लक्ष रु. संपूर्ण कार्य पूर्ण होईल असे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१५) :** (१) होय अंशत: खरे आहे.

नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील टि.बी.वार्ड क्र. ४२ मधील २०० स्क्वे. फुट फ्लोअर दुरुस्ती ऐवजी संपूर्ण वार्डाचे दुरुस्तीकरीता खालीलप्रमाणे नमूद क्षेत्रफळाच्या दुरुस्तीकरीता दोन अंदाजपत्रके सादर करण्यात आलेली असून त्याची एकुण रक्कम रु. ५५,५८,८३९/- इतकी आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील टी.बी. वॉर्डो परीसरातील वार्ड क्र.४२ च्या प्रसाधन गृहाचे नुतनीकरण (अंदाजे १८९२ चौ. फूट) | रु. ९,९८,८३९/- |
| २. | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील टी.बी. वॉर्ड परीसरातील वार्ड क्र.४२ चे नुतनीकरण (अंदाजे ५४९० चौ.फूट) | रु. ४५,६०,०००/- |

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माथेरान (ता.नेरळ,जि.रायगड) या पर्यटनस्थळी संरक्षक भिंती बांधण्याबाबत**

**(२९) २१३२९ (१३-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता.नेरळ,जि.रायगड) या पर्यटनस्थळी जाण्यासाठी तीन रस्ते असून यापैकी सर्वाधिक वाहतूक असलेल्या नेरळ माथेरान घाट रस्त्यतील प्रवास पर्यटक आणि वाहन चालकांना सुखकर व्हावा म्हणून अनेक ठिकाणी संरक्षक भिंती बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतले आहे यापैकी महत्वाच्या असलेल्या जुम्मापट्टी धबधब्याच्या पहिल्या वळणावरील संरक्षक भिंतीचे काम ऑक्टोबर २०१४ मध्ये सुरु करण्यासाठी मार्किंग करण्यात आले होते मात्र सहा महिन्यानंतरही हे काम आहे त्याच स्थितीत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव पर्यटकांची सुरक्षा धोक्यात आली आहे याबाबत हे रखडलेले काम सुरु करुन पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१५)** :(१) होय.

(२) जुलै २०१४ च्या अतिवृष्टीमुळे नेरळ माथेरान (रा.मा.१०९) रस्त्याच्या कि.मी. १/४०० ते १/४१५ (जुमापट्टी भाग) लांबी १५.०० मीटर, हा भाग रस्त्याच्या दरीकडील बाजुस खचलेला होता. या लांबीमधील संरक्षक भिंत बांधण्याचे काम मार्च २०१५ च्या अर्थसंकल्पात मंजूरीसाठी सादर करुन मंजूरी प्राप्त करुन घेण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सदरचे काम निविदा स्तरावर असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम हाती घेण्यात येत आहे व ते लवकरच पूर्ण करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर ( जि.लातूर) येथे शासकीय एमआयडीसीसाठी केवळ १२ हेक्टर जमिन राखीव ठेवण्यात आल्याबाबत**

**(३०) २१५८५ (३१-०७-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि. लातूर) येथील ६२५ हेक्टर जमिन शासकीय एमआयडीसीसाठी संपादित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ती जागा रद्द होवून ६२५ हेक्टर ऐवजी एमआयडीसीसाठी केवळ १२ हेक्टर जमिन राखीव ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसीचे काम सुरु करून औद्योगिक प्रगतीसाठी उर्वरीत जागेचा नव्याने सर्व्हे करुन शासकीय एमआयडीसी सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-११-२०१५)** :(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) उद्गीर (जिल्हा लातूर) येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे चांदेगाव पाटी, लिंबगाव, कासराळ, सोमठाणा, वागदरी, टाकळी व चोंडी तालुका येथील पहिल्या टप्प्यासाठी १०० ते २०० हे.आर.इतक्या खाजगी क्षेत्राची प्रादेशिक अधिकारी, लातूर यांच्या स्तरावर प्राथमिक पहाणी करण्यात आली आहे. प्रस्तावाची व्यवहार्यता तपासून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अलिबाग रेवस (जि.रायगड) मार्गावरील सारळ पुलाच्या दुरुस्तीबाबत

**(३१) २१७७० (३०-०७-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रातील अलिबाग रेवस मार्गावरील सारळ येथील पूल वाहतूकीस धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूकीस धोकादायक असलेल्या पूलाच्या विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक मंजूरीविना प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूलाच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यास विलंब लागण्याची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१२-२०१५) :**(१) सदरचा पुल धोकादायक नाही.

(२) व (३) पूलाच्या आवश्यक दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात येत आहे. तसेच सदर पूलाच्या ठिकाणी नवीन पूल बांधण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी रु. १२० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. या नवीन पूलाचे काम नाबार्ड-२१ मध्ये प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

---

### सार्वजनिक बांधकाम विभागाने निगराणी व दुरुस्तीसाठी केलेल्या खर्चाबाबत

**(३२) २१९६३ (३०-०७-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालय, आमदार निवास, मंत्र्याचे बंगले, रुग्णलये, आरोग्य भवन, अधिका-यांची निवासस्थाने, बीडीडी चाळी, वांद्रे येथील कर्मचारी निवासस्थाने, सरकारी महाविद्यालये व वसतिगृहे, पोलीस ठाणे आणि न्यायालये आदि इमारतींवर आतापर्यंत निगा व दुरुस्ती अंतर्गत शासनाने म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाने गेल्या दोन वर्षात किती रुपये खर्च केले आहेत,

(२) उक्त रकमेतून कोणकोणत्या स्वरुपाची दुरुस्ती व निगराणी खर्चाची कामे करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१५) :** (१)

| वर्ष | बाब | प्राप्त अनुदान (रु.लक्ष) | खर्च (रु.लक्ष) |
|---|---|---|---|
| २०१३-१४ | परिक्षण व दुरुस्ती (सर्वसाधारण दरुस्ती, विविक्षित दुरुस्ती व अटळ बाबी) | २४३९६.०० | २४३९६.०० |
| | बांद्रा कॉलनी | ३४०४.४० | ३४०४.४० |
| | बीडीडी चाळी | २७७४.८० | २७७४.८० |
| २०१४-१५ | परिरक्षण व दुरुस्ती (सर्वसाधारण दुरुस्ती, विविक्षित दुरुस्ती व अटळ बाबी) | २०३३५.५३ | २०३३५.५३ |
| | बांद्रा कॉलनी | १७००.०० | १७००.०० |
| | बीडीडी चाळ | ८८०.८० | ८८०.८० |
| एकुण | | ५३४९१.५३ | ५३४९१.५३ |

(२) उक्त रक्कमेतून मुंबई (सा.बां.) मंडळांतर्गत मंत्रालय, आमदार निवास, मंत्रीमहोदयांचे बंगले, उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची निवासस्थाने, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, न्यायाधीश महोदयांची निवासस्थाने, रुग्णालये, आरोग्य भवन, विक्रिकर भवन, विविध शासकीय कार्यालये, बीडीडी चाळी, वांद्रे येथील कर्मचारी निवासस्थाने, सरकारी महाविद्यालये व वसतीगृहे, पोलीस कार्यालये, पोलीस निवासस्थाने इ. इमारतींची परिरक्षण व दुरुस्तीची कामे करण्यात आली. तसेच सदर इमारतीची कामे सुरु आहेत.

(३) सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेले अनुदान पुर्णपणे खर्च झालेले आहे. त्यामुळे खर्चाबाबत विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार (प्रतिबंध) कायदा १९८९ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३३) २३०५४ (३०-०७-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार (प्रतिबंध) कायदा १९८९ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या न्या. पळशीकर समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर शिफारशींवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-१०-२०१५) :**(१) होय, अंशत: खरे आहे.

अनुसूचित जाती जमाती अत्याचार (प्रतिबंध) कायदा, १९८९ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या न्या.पळशीकर समितीचा अंतरिम अहवाल दि.२ डिसेंबर, २०१० रोजी शासनास प्राप्त झालेला आहे.

(२) सदर समितीच्या शिफारशीचे थोडक्यात स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

१) पोलीस विभागाने चौकशीसाठी एक चेकलिस्ट तयार करावी.

२) साक्षीदाराचे म्हणणे व कोर्टापुढे सादर होणारा अहवाल यामध्ये सुसंगतपणा असावा.

३) कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र शासनाऐवजी राज्य शासनास अधिकार असावेत.

४) सर्व जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांनी महिन्यातून किमान एका दलित वस्तीत भेट द्यावी असे त्यांच्या डायरीमध्ये बंधनकारक असावे.

५) पीसीआर सेल व पोलीस खाते यामध्ये समन्वये साधण्यासाठी दर तीन महिन्यांनी प्रशिक्षण वर्ग घेण्यात यावे.

(३) सदर समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यावर समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनामार्फत कार्यवाही करण्याचे शासनास विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणवाडी (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथील आदिवासी आश्रमशाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत**

**(३४) २३१३२ (३१-०७-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणवाडी (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथील नाग्या साक्या पाटबंधारे विभागाच्या जुन्या व

मोडकळीस आलेल्या कॉलनीत शासकीय आदिवासी आश्रमशाळेचे कामकाज सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) तसेच, अद्ययावत शासकिय आदिवासी आश्रमशाळेच्या इमारतीचे, मुलांचे व मुलीचे वसतीगृहाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-११-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) शासकीय आश्रमशाळा डुबगुले ता.मालेगाव येथे इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग मंजूर आहेत. सदर शाळा सुरुवातीला भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीत सुरु करण्यात आली. मात्र तेथे पुरेशा क्षेत्रफळाची जागा उपलब्ध होत नसल्याने शासन पत्र दिनांक १७/११/२००९ अन्वये सदर आश्रमशाळा लघु पाटबंधारे विभागाच्या नाग्या-साक्या, ता.नांदगाव, जि.नाशिक येथील कर्मचारी वसाहतीमधील रिकाम्या इमारतीत तातडीची गरज म्हणून स्थलांतरीत करण्यात आली आहे.
(३) सदरच्या शाळेची जागा विभागाच्या नावावर नसल्याने तेथे इमारती, सोयी सुविधांचे बांधकाम करता येत नाही. तसेच सदर शाळेतील पटसंख्या अत्यंत कमी आहे त्यामुळे सदर शाळेचे मध्यवर्ती शासकीय आश्रमशाळेत समायोजन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार समायोजनासाठी प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील वनहक्क कायद्याअंतर्गत वन जमिनी मागणीबाबतची शेकडो प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) २३१३९ (०६-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगांव तालुक्यातील पळाशी, कासारी, परधाडी, माणिकपुंज, हिरेनरग, चांदोरा, रणखेडा, लोहशिगवे, जामदरी, तळवाडे, न्यायडोंगरी, पिंप्रीहवेली, कुसुमतेल, पोही, कसबाखेडा, सोयगांव, आदी गावातील वनहक्क कायद्याअंतर्गत वन जमिनी मागणीबाबतची शेकडो प्रकरणे जिल्हास्तरीय वन हक्क समिती (अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय) मालेगांव या कार्यालयाकडे अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रलंबित प्रकरणांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-११-२०१५)** :(१) हे खरे नाही.

नाशिक जिल्ह्यातील नांदगांव तालुक्यातील वनहक्क कायद्यांतर्गत जिल्हास्तरीय वनहक्क समिती, मालेगांव कार्यालयाकडे एकही मुळ दावा व अपिल दावा प्रलंबित नाही.

(२) व (३) याव्यतिरिक्त जिल्हास्तरीय समितीने उपविभागीय समितीकडे फेरचौकशीसाठी पाठविलेले नांदगांव तालुक्यातील प्रलंबित असलेले २२४ अपिल दावे माहे डिसेंबर, २०१५ अखेर अंतिम निकाली काढण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यातील विविध जिल्ह्यात संजय गांधी अनुदान योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(३६) २३३६० (३०-०७-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्ह्यात संजय गांधी अनुदान योजनेत झालेल्या गैरव्यवहार व प्रलंबित प्रकरणाबाबत सोडवणूक करण्याबाबतची मागणी संबंधित जिल्हा समित्यांचे पदाधिकारी, संबंधित आमदार तथा अध्यक्ष यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (विशेष सहाय्य), मा.राज्यमंत्री (विशेष सहाय्य), मा.पालकमंत्री तथा संपर्कमंत्री संबंधित जिल्हा नियोजन, संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक २० मे, २०१५ वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदरचे काम किती कालावधीत हाती घेण्यात येईल वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-१२-२०१५)** :(१) व (२) सदर निवेदनाचा शोध घेतला असता शासनाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, या योजनेतील शासन रकमेचा गैरव्यवहार व अपहार झाल्यास जिल्हाधिकारी यांनी त्वरीत तपास करुन दोषींवर गुन्हे दाखल करावेत असे निर्देश शासनाने यापूर्वीच शासन निर्णय दि.२६.१०.२०१० नुसार दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपंग व्यक्तींना अनुदान देण्यात आले नसल्याबाबत**

**(३७) २४१२० (३०-०७-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग व्यक्तींना आयुष्याचा जोडीदार सशक्त मिळवा यासाठी सरकारने सुरू केलेल्या अनुदान योजनेला दहा वर्षानंतरही अनुदान देण्यात आले नसल्यामुळे पुणे जिल्ह्यात १२

प्रस्ताव धूळखात पडले असल्याची बाब एप्रिल २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंग व्यक्तीसोबत विवाह करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी अशा जोडप्यांना शासनाच्या वतीने रु.५० हजार अर्थसहाय्य दिले जाते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील दीड वर्षापासुन उक्त योजनेकरीता शासनाने निधी उपलब्ध केला नाही, हे खरे आहे काय, तसेच जानेवारी, २०१४ पासुन समाजकल्याण विभागाला पाठविलेल्या आर्थिक सहाय्यासाठी प्रकरणे अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-११-२०१५) :**(१) अशंतः खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अपंग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी रु. ५० हजार इतके आर्थिक सहाय्य देण्याची योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय अपंग-२०१३/प्र.क्र.१०३ अ.क्र.२, दिनांक १७ जून, २०१४ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे.

सदर योजनेकरीता निधी अर्थसंकल्पीय करण्यास स्वतंत्र लेखाशिर्षाबाबत प्रस्ताव वित्त विभगास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने काही मुद्ये उपस्थित केले होते. सदर मुद्यांची पुर्तता करुन सुधारित प्रस्ताव वित्त व नियोजन विभागास फेरसादर करण्यात आलेला आहे. स्वतंत्र लेखाशिर्ष उपलब्ध झाल्यानंतर प्रस्तुत योजनेकरीता निधी वितरणाबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात येईल.

---

### राजपूत भामटा, परदेशी भामटा, परदेशी भामटी जातीचे प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्राच्या अडचणी दूर करण्याबाबत

**(३८) २४३८५ (३०-०७-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजपूत भामटा, परदेशी भामटा, परदेशी भामटी जातीचे प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्राच्या अडचणी दूर करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ४ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना एक लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार या संदर्भात निर्णय घेण्याबाबत बैठक घेण्यात आली आहे काय, त्या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२३-११-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत बैठक होऊ शकली नाही. तथापि, बैठक घेण्याबाबत पुन्हा प्रस्तावित करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देवगड तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) मिठमुंबरी-तारामुंबरी दरम्यानच्या खाडीवरील पूलाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(३९) २४५३० (१४-०८-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) प्रजिमा ४ वरील मिठमुंबरी-तारामुंबरी दरम्यानच्या खाडीवरील पूलाचा बांधकामास केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत रुपये १८ कोटी ५० लक्ष इतक्या रक्कमेस दिनांक ५ जानेवारी, २०११ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यानंतर मे.एम.बी.घारपुरे इंजिनिअर्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन्स, पुणे यांना दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून कामाची मुदत २४ महिने आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पूलाच्या एका पिलर्सचे तसेच पूलास जोडणा-या भरावाचे काम रखडले आहे व काम सध्या बंद पडलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असलयास, सदरहू काम अर्धवट स्थितीत बंद पडण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) तसेच या पूलाच्या व जोड रस्त्यांच्या कामावर दिनांक ३१ मार्च, २०१५ अखेर प्रत्यक्षात एकूण किती रक्कम खर्च करण्यात आलेली आहे,

(५) सदरहू पूलाचे, पूलाला जोडणाऱ्या दोन्ही बाजूच्या भरावाचे तसेच रस्त्यांचे बंद पडलेले काम विनाविलंब हाती घेवून सदरहू पूलासह रस्ता लवकरात लवकर दळणवळणासाठी कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) जमिनीचे भूसंपादन करणेस स्थानिक रहिवाशी यांचा विरोध होत असल्याने पूलाचे काम सद्यस्थितीत बंद आहे,

(४) रु. १४४२.३२ लक्ष

(५) भूसंपादन प्रकिया व भरपाईच्या प्रर्त्यापणाची प्रक्रिया लवकर होण्याच्या दृष्टीने खाजगी वाटाघाटीने भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे. भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर पूलाचे व जोड रस्त्याचे काम हाती घेऊन पूर्ण करण्याचे प्रयत्न राहील.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मोहोळ तालुक्यातील उजनी डावा कालव्यास अस्तरीकरणाअभावी निर्माण झालेला धोका

**(४०) २४६३० (१४-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ तालुक्यातील उजनी डावा कालव्याची बांधकाम पूर्ण होऊन ३५ वर्ष झाले असून कालवा जीर्ण होऊन त्याला ठिकठिकाणी तडे गेले आहेत तर काही ठिकाणी तड्यांचे मोठ्या भेगात रुपांतर झाले अाहे, तसेच ठिकठिकाणी काटेरी वृक्ष वाढले आहेत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या कालव्यास अस्तरीकरण करणे गरजेचे असतानाही निधी अभावी ते होऊ शकले नाही, अस्तरीकरणाअभावी भविष्यात हा कालवा फुटून धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कालव्याचे अस्तरीकरण करण्यासाठी व भविष्यात कालवा फुटीची दुर्घटना घडू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे,

(२) नाही,

(३) आवश्यकतेनुसार कालव्याच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

---

### बांदा - सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील तेरेखोल नदीपात्रावर पूल बांधण्याबाबत

**(४१) २४६४२ (१३-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांदा - सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) शहरालगत असलेल्या आणि शेर्ले गावातील ओरसबाग या वाडीचे तेरेखोल नदीपात्राने विभाजन झाल्याने ओरसबाग वाडीतील ग्रामस्थांना जीवघेण्या होडीने नदीपात्रातून प्रवास करावा लागतो, यासाठी पूल बांधण्यासाठी तत्कालीन युती शासनातील (१९९५) सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी केलेल्या भूमिपूजनास २० वर्षे उलटून गेली तरी अद्याप कामास सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदर पुलाचे काम शासनाने हाती घेऊन पूर्ण करावे यासाठी गेली २० वर्षे लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी वारंवार निवेदने देऊन मागण्याही केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तेरेखोल नदीपात्रावर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१५)** :(१) व (२) होय.

(३) व (४) ओरसबाग ही वाडी रा.मा.क्र. ६६ या पर्यायी मार्गाने जोडलेली आहे. तथापि अंतर कमी असल्याने वाडीतील ग्रामस्थ शेर्ले गावी जाण्यासाठी होडीतून प्रवास करतात. विषयांकीत पूल ग्रामीण मार्गावरील असून या पूलासाठी अंदाजे रु. १३ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करणे ही बाब जिल्हा नियोजन समितीच्या अखत्यारित आहे. परंतु जिल्हा नियोजन समितीकडे उपलब्ध नियत व्ययातून सदरचे मोठया अंदाजित खर्चाचे काम हाती घेणे शक्य झालेले नाही. जिल्हा नियोजन समितीकडील उपलब्ध नियतव्ययातून प्राधान्यक्रम व निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे प्रयत्न राहतील.

---

**मौजे खालुंब्रे (ता.खेड, जि.पुणे) गावातील गायरानाची जमीन**
**एम.आय.डी.सी.ने संपादित केल्याबाबत**

**(४२) २५११३ (३१-०७-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खालुंब्रे (ता.खेड, जि.पुणे) गावातील गायरानाची गट ९० क्षेत्र १२.७९ हेक्टर आर गट ९१ क्षेत्र २२.३१ हेक्टर आर व गट क्र. ९२ क्षेत्र १०.४५ हेक्टर आर एकुण ४५.६४ हेक्टर आर ही जमीन चाकण येथील एमआयडीसीने संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाची लोकसंख्या वाढत असल्याने ग्रामपंचातीला विकास कामांसाठी जमिन शिल्लक नसल्याने संपादित केलेल्या गायरानातील १५ एकर जमीन ग्रामपंचायतीला परत द्यावी अशी मागणी ग्रामपचांयत खालुंब्रेच्या ग्रामसेवक व सरपंचानी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमरास मा.उद्योग मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-११-२०१५)** :(१) चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ करिता मौजे खालुंब्रे येथील गायरान जमिनीतील गट नं. ९०,९१ व ९२ चे एकूण ४५.६४ हे.आर क्षेत्राचा ताबा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास दिनांक १९ जुलै, २००७ रोजी प्राप्त झाला आहे,

(२) होय, हे खरे आहे,

(३) ग्रामपंचायत खालुंब्रे यांनी गावठाण विस्तारासाठी व विकास कामांसाठी १० हेक्टर क्षेत्राची मागणी केली आहे, त्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून गायरान क्षेत्रापैकी ६ हेक्टर म्हणजे १५ एकर क्षेत्र संबंधित ग्रामपंचायतीला परत करण्यासंबंधीचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद येथील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४३) २५१६५ (३०-०७-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील समाज कल्याण आयुक्त कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील औरंगाबाद, जालना, परभणी व बीड या चार जिल्ह्यातील १४९९ महाविद्यालयात वर्षे २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात ११ वी ते पदवी, पदवीत्तरसह व्यावसायिक शिक्षण घेत असलेल्या १,६५,१८४ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिलह्यातील विद्यार्थी शैक्षणिक वर्ष संपले तरी अद्याप शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत तसेच निधीअभावी त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-११-२०१५) :**(१) अंशतः हे खरे आहे,

सन २०१३-१४ या वर्षात औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, बीड व परभणी या चार जिल्ह्यातील एकूण १५३८ महाविद्यालयातील १,६५,१९४ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज केले आहेत,

(२) नाही,

उपरोक्त प्राप्त अर्जापैकी १,५५,९५६ अर्ज मंजूर करण्यात आले असून २९०५ अर्ज नामंजूर झाले आहेत, उर्वरित अर्जापैकी ५०८२ अर्ज महाविद्यालय स्तरावर व १२५१ अर्ज जिल्हा पातळीवर प्रलंबित आहेत,

(३) महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित अर्ज प्राप्त करुन घेऊन ते अर्ज तसेच जिल्हा पातळीवरील प्रलंबित अर्ज प्राधान्याने निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे देवधाबा-मलकापूर (जि.बुलढाणा) जवळ नळगंगा नदीवरील पुलाच्या बांधकामाबाबत

**(४४) २५४२२ (३१-०७-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे देवधाबा-मलकापूर या प्रमुख जिल्हा मार्गावर १२/०० मध्ये मलकापूर जवळ नळगंगा नदीवर पुल नसल्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना व इतर पादचारी नागरीकांना ये-जा करणे त्रासाचे झाले असल्याचे माहे जुन, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी १८० लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(३) उपरोक्त पुलाचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१२-२०१५) :** (१) व (२) होय.

सदर प्रमुख जिल्हा मार्ग -७ या मार्गावर सद्यस्थितीत कि.मी. १२/०० मध्ये कमी उंची (२.३० मीटर उंच) असलेला लहान पुलावरुन वाहतूक सुरु असते. मात्र पावसाळयात नळगंगा नदीस येणाऱ्या पुरामुळे सदर मार्गावरील वाहतूक बंद पडून दुचाकी व चारचाकी वाहनांना उंच पूल नसल्याने दळणवळणासाठी गैरसाईचे होते. प्रश्नात मागणी केल्याप्रमाणे उंच पूल व जोडरस्ता बांधावयाचा असल्यास त्याकरिता अंदाजे रुपये २२०.०० लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे.

(२) प्रश्नाधीन पूलाच्या कामाकरिता मा. लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांचेशी चर्चा केली आहे.
(४) व (५) प्रश्नाधीन पूलाची पाहणी केली असून प्रस्तुत पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**मौजे जिगांव-बडनेर भोलजी-निंबोळा देवी-टाकरखेड (जि.बुलडाणा) मध्ये मोरीचे बांधकाम न झाल्याबाबत**

**(४५) २५४२४ (३१-०७-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे जिगांव-बडनेर भोलजी-निंबोळा देवी-टाकरखेड (जि.बुलडाणा) मध्ये रा.मा. २७७ व किमी २५/३०० व २५/९०० मध्ये मोरीचे बांधकाम नसल्यामुळे पावसाळ्यामध्ये हा रस्ता खड्डा पडून वाहून जात असल्याची बाब जुन २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या रस्त्यावर दोन ठिकाणी मोरीच्या बांधकामासाठी २०० लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मोरीचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मोरीचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१२-२०१५) :**(१) व (२) प्रश्नाधीन मौजे जिगाव-बडनेरा भोलजी-निंबोळा देवा-टाकरखेड (जि. बुलढाणा) मधील राज्य मार्गावरील कि.मी. २५/२०० ऐवजी कि.मी २५/३०० मध्ये एक स्लॅब ड्रेन आणि कि.मी. २६/० मध्ये एक पाईप मोरी तसेच अतिरिक्त सा.क्र. २६/९००, २७/५०० मध्ये दोन मोऱ्यांच्या बांधकामाची आवश्यकता आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि., खामगांव यांना मौखिकरित्या सूचित करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्नाधीन बांधकामे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**राज्यातील आदिवासी बांधव मुलभूत सुविधापासून वंचित असल्याबाबत**

**(४६) २५४५६ (३१-०७-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शासनाने लाखो रुपये खर्च करुन सुध्दा आदिवासी बांधव मुलभूत सुविधांपासून कायम वंचित असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी वाड्यांवर पिण्याच्या पाण्याची कमतरता, विद्युत पुरवठा व शासकीय योजनेतून मिळणारी घरे असे अनेक प्रश्न अद्यापही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०५-११-२०१५) :**(१) हे खरे नाही,

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आमला, एंडली, दारापूर येथे ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत आदिवासी भवन व नाली बांधकाम करण्याबाबत**

**(४७) २५६०३ (३१-०७-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमला, एंडली, दारापूर येथे ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत आदिवासी भवन (सांस्कृतिक भवन) व नाली बांधकाम करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांचेकडे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अमला, एंडली येथे आदिवासी भवन (सांस्कृतिक भवन), काँक्रिट रस्ता तसेच पाण्याची टाकी व बोअरवेल यासाठी रु.३० लक्ष इतक्या किंमतीच्या कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे. तथापि, निधीच्या मर्यादेमुळे नाली बांधकामास मंजूरी देण्यता आलेली नाही. तसेच दारापूर येथे आदिवासी भवन (सांस्कृतिक भवन) व काँक्रिट रस्ता यासाठी रु.२० लाख इतक्या किंमतीच्या कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे. मात्र नाली बांधकामाचा प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, धारणी यांना प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गिरणा उजवा कालवा (ता.देवळा, जि.नाशिक) या कालव्याची झालेली दुरवस्था**

**(४८) २६००४ (१७-०८-२०१५). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणा उजवा कालवा (ता.देवळा, जि.नाशिक) या कालव्याची अतिशय दुरवस्था झालेली आहे याची शासनास माहिती आहे काय,

(२) या कालव्याचे नुतणीकरण करण्याची मागणी स्थानिक शेतक-यांनी वेळोवेळी केलेली असून त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(३) नसल्यास, या कालव्याचे नुतनीकरण करण्यासाठी शासनाने तातडीच्या काही उपाययोजना केलेल्या आहेत काय ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) कालव्याचे विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिये स्तरावर चालू आहे.

---

**अलिबाग-रेवदंडा (जि.रायगड) मार्गावरील नवेदरबेली येथील पुलाच्या दुरुस्तीबाबत**

**(४९) २६५०४ (१४-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग-रेवदंडा (जि.रायगड) मार्गावरील नवेदरबेली येथील पुल नादुरुस्त झाला असून पुलाच्या संरक्षक कठड्यासह बाजूचे बांधकाम कमकुवत झाल्यामुळे पुलाला धोका निर्माण झाल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग येथे नागांव, आक्षी या गावांसह चौल, रेवदंडा, साळाव, मुरुडकडे जाण्यासाठी हा प्रमुख मार्ग असून या मार्गावर पर्यटकांमुळे मोठ्या प्रमाणात रहदारीदेखील असते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुलाची कठडयासह त्वरीत दुरुस्ती न केल्यास या ठिकाणी मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याबाबत लोकप्रतिनिधीनी व नागरिकांनी संबंधितांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पुलाच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

पुलाचा कठडा तुटलेला आहे. तथापि पुल कमकुवत झालेला नसुन वाहतुकीच्या दृष्टीने पूल सक्षम आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर पुलाचे रेलींग नादूरुस्त झाले होते. सदर कामाची निविदा निश्चिती झाली असून काम प्रगतीपथावर आहे व हे काम ३० डिसेंबर, २०१५ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवनाची कामे शिल्लक असल्याबाबत**

**(५०) २६७९६ (३०-०७-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात हिंगोली रोड वरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवनाचे उद्‌घाटन झाले असुनही त्यातील अनेक कामे शिल्लक असल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीची बरीच कामे शिल्लक असतांनासुध्दा उद्‌घाटन करण्याची कारणे काय आहेत तसेच उक्त कामे केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (१६-११-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नांदेड या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असल्याने सदर इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले आहे, तथापि, काही किरकोळ कामे करण्याचे शिल्लक असून सदर कामे माहे ऑगस्ट, २०१५ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**विधान भवन :** | **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** | **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.